जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक -१५४ दिनांक - १६/०२/२०२३**

वानवडी पोलीस स्टेशन,पुणे शहर

**घरफोडी व वाहनचोरी करणारे चोरांना व त्यांचे अल्पवयीन साथीदारांना केले जेरबंद, त्यांचेकडुन चोरीच्या ०५ दुचाकी,मोबाईल व इतर मुद्देमाल केला जप्त.**

वानवडी पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक,भाऊसाहेब पटारे यांचे सुचनांप्रमाणे वानवडी तपास पथक प्रभारी पोलीस उपनिरिक्षक,अजय भोसले व पोलीस अंमलदार असे पोलीस ठाणे हद्दीत वाहन चोरीच्या गुन्हयांना प्रतिबंध करणेकामी सतर्कतेने पेट्रोलिंग करीत असताना, पोलीस अंमलदार, अमोल गायकवाड व विष्णु सुतार त्यांना त्यांचे खास बातमीदारांमार्फत माहिती मिळाली की,रामटेकडी वानवडी परिसरात घरफोडी व वाहनचोरी करणारी मुले ही रामटेकडी डोंगरांवरील पाण्याचे टाकी जवळ थांबलेले असुन ते दोन गटांत तेथे थांबलेले आहेत. तसेच त्यांचेकडे चोरीची दुचाकी असलेलेबाबत मिळालेले बातमीवरुन वानवडी पोलीस स्टेशनकडील वरील अधिकारी व अंमलदार यांनी सदर भागांत सापळा रचून प्रथम खालील आरोपींतास ताब्यात घेवुन त्यास अटक करण्यात आली आहे.

पहिल्या कारवाईत **१)अरबाज युसुफ शेख,वय-२२ वर्षे,रा.गल्ली नं.९,मिठानगर,कोंढवा,पुणे** यास **वानवडी पो. स्टे. गु.रजि.नं.८८/२०२३ भा.दं.वि.कलम ३७९,३४** गुन्हयांत अटक करुन,त्याने चोरी केलेली एकुण २,६१,०००/- रु.किची ०४ वाहने जप्त केलेली असुन त्याचे **०२ अल्पवयीन साथीदार यांना ताब्यात घेवुन,त्यांचेकडुन** २५,०००/- रुपये किंमतीचा एक मोबाईल हॅन्डसेट जप्त करण्यात आलेला आहे.

त्याबाबत दाखल असलेले वानवडी पोलीस ठाणेकडील २ गुन्हे,सहकारनगर पोलीस ठाणेकडील १ गुन्हा व कोंढवा पोलीस ठाणेकडील १ गुन्हा असे एकुण ४ गुन्हे उघडकीस आणले असुन,त्यांनी चोरी केलेले मोबाईलबाबत अधिक तपास चालु असुन त्यांचेकडुन आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

तसेच दुस-या कारवाईत **घरफोडी करणारे ०२ अल्पवयीन मुलांना ताब्यात घेवुन**,त्यांचेकडे अधिक तपास केला असता,त्यांनी **वानवडी पोलीस ठाणे गु.र.नं.७३/२०२३,भा.दं.वि.कलम ४५४,४५७,३८०** मधील चोरी केलेला काही मुद्देमाल हस्तगत केलेला असुन,दोघांनी मिळुन चोरी केलेली एक लाल ॲक्टीवा गाडी हस्तगत करण्यात आलेली असुन,तीचे संबंधीत दाखल असलेला खडकी पोलीस ठाणेकडील वाहनचोरीचा गुन्हा उघडकीस आणुन,त्यांचेकडुन किं.रु. ५०,०००/- रुपयेचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला असुन त्याबाबतचे एकुण ०२ गुन्हे उघडकीस आणलेले आहेत.

सदरची कारवाई ही मा.पोलीस आयुक्त पुणे शहर,श्री.रितेश कुमार,मा.सहपोलीस आयुक्त,श्री.संदिप कर्णीक, मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशीक विभाग,पुणे शहर,श्री.रंजनकुमार शर्मा, मा.पोलीस उप-आयुक्त, परि.५,पुणे,श्री.विक्रांत देशमुख, मा.सहा.पोलीस आयुक्त,वानवडी विभाग,पुणे,श्रीमती पौर्णिमा तावरे यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरिक्षक,भाऊसाहेब पटारे, पोलीस निरिक्षक,गुन्हे,संदिप शिवले व तपास पथकातील पोलीस उप-निरिक्षक,अजय भोसले,पोलीस अंमलदार,अमजद पठाण,विनोद भंडलकर,अतुल गायकवाड,संतोष नाईक,महेश गाढवे,राहुल गोसावी,निलकंठ राठोड,अमोल गायकवाड, विष्णु सुतार,विठ्ठल चोरमले व मनिषा सुतार यांनी केली आहे.

दाखल गुन्हयाचा अधिक तपास पोलीस उपनिरिक्षक,अजय भोसले हे स्वतः करीत आहेत.


महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
वानवडी पोलीस ठाणे
पुणे शहर
फोन नं. : ०२०-२६८२४९८१
SUNPOWER INDIA
An EPC Company